आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२५

ठळक बातम्या

1. बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीची बहुमताकडे वाटचाल.
2. 'देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र अभिवादन.
3. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची एसटीच्या उत्पन्नवाढ आणि प्रवासी सेवा उन्नतीसाठी 'पंचसूत्री आराखड्याची' घोषणा.
4. नागपुरात होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाची तयारी अंतिम टप्प्यात, 28 नोव्हेंबर पासून सचिवालयाचे कामकाज सुरु होणार.
5. भारताविरुद्धच्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी दक्षिण आफ्रिकेचा संघ १५९ धावांत गारद.

बिहार मतमोजणी

बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीतल्या कलानुसार राष्ट्रीय लोकशाही आघाडी बहुमत घेऊन सरकार स्थापन करणार असल्याचं चित्र आहे. विधानसभेच्या २४३ पैकी जवळपास २०४ जागांवर राष्ट्रीय लोकशाही आघाडी पुढं आहे, तर महाआघाडी ३३ जागांवर पुढे आहे. भारतीय जनता पक्ष ९२, संयुक्त जनता दल ८४, तर लोकजनशक्ती पार्टी १९ जागांवर आघाडीवर आहे. राष्ट्रीय जनता दल २५ तर काँग्रेसनं आतापर्यंत ५ जागांवर आघाडी मिळवली आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएला मिळालेला अभूतपूर्व विजय हा देशाच्या राजकीय परिवर्तनाचं प्रतीक असल्याचं मत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केलं.बिहार विधानसभेच्या निकालावर प्रतिक्रिया देताना बिहारच्या इतिहासात कधीही न मिळालेलं बहुमत एनडीएला मिळालं आहे, जनता विकास, विश्वास आणि विकसित भारताच्या संकल्पनेसोबत उभी राहिली असं ते म्हणाले. दरम्यान, सात राज्यांमधल्या आठ विधानसभा मतदरासंघांच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी देखील आज होत आहे. यामध्ये जम्मू काश्मीरमधल्या बडगाम आणि नगरोटा, राजस्थानमधल्या अंता, झारखंड मधल्या घाटशिला, तेलंगणा मधल्या जुबली हिल्स, पंजाब मधल्या तरनतारन, मिझोराम मधल्या डम्पा आणि ओडिशामधल्या नुआपाडा या मतदारसंघांचा समावेश आहे. डम्पा मतदारसंघातून मिझो नॅशनल फ्रंटचे उमेदवार विजयी झाले.

पंडीत जवाहरलाल नेहरू जयंती

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. यानिमित्त बाल बाल दिन आज साजरा होत असून, विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशातून नेहरुंचं स्मरण केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज राष्ट्रपती भवनात बालदिनानिमित्त विविध शाळा आणि संघटनांच्या विद्यार्थ्यांसोबत संवाद साधणार आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात देखील पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेच पूजन करण्यात आलं.

बालदिन–कारागृह

नागपूर मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने घेतलेल्या पुढाकारातुन आज आई-वडिलांच्या प्रेमापासून वंचित झालेल्या सुमारे तीनशे मुलांची प्रत्यक्षात गळाभेट घडवून आणली.निमित्त होते बाल दिवसाचे. बंदिवान आणि त्यांच्या पाल्यांची ही गळाभेट हृदयस्पर्शी ठरली. या माध्यमातून बंदिवान आणि त्यांच्या मुलांचे नाते आणखी घट्ट होणार असल्याचा विश्वास दीपा आगे यांनी नागपूर कारागृह प्रशासनाच्या वतीनं व्यक्त केला.

**प्रताप सरनाईक**

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सेवांच्या उन्नतीसाठी 'पंचसूत्री आराखड्याची' घोषणा केली आहे. मुंबईत झालेल्या बैठकीत आगार, विभाग आणि प्रादेशिक पातळीवर दैनंदिन आढावा बैठका अनिवार्य करण्यात आल्या असून प्रवासी तक्रारी, रद्द फेऱ्या आणि वाहन दुरुस्तीवर तात्काळ कारवाईचे निर्देश दिले आहेत. चालकांसाठी KPTL अर्थात किलोमीटर प्रति १० लीटर लक्ष्य आणि वाहकांसाठी दैनंदिन CPKM म्हणजे संचित प्रति किलोमीटर उत्पन्न उद्दिष्टे देऊन महसुलात सुधारणा साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. १ जानेवारीपासून राज्यातील सर्व बसस्थानकांसाठी नवे वेळापत्रक लागू होणार असून स्वच्छता, माहिती प्रसारण आणि वेळपालनावर भर देत 'प्रवासी देवो भव' या तत्वानुसार सुविधा उंचावल्या जाणार आहेत. लांब आणि मध्यम पल्ल्याच्या बसेसाठी आरक्षण वाढवणे, भारमान ८०% राखणे आणि जादा फेऱ्या उपलब्ध करून देण्याचही नियोजन करण्यात आलं आहे.

**प्रदेश संचालन समिती**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजपने प्रदेश संचालन समिती जाहीर केली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीने जारी झालेल्या या यादीत २२ पदांसाठी विविध नेत्यांना महत्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. यात समन्वयक म्हणून माधवी नाईक यांची नियुक्ती करण्यात आली असून, सहसमन्वयक पदी विक्रांत पाटील यांची निवड करण्यात आली आहे. तर, विश्वास पाठक हे जाहीरनामा प्रमुख असतील. त्यासोबतच निवडणूक कार्यक्रम, प्रचार, महिला, युवा, सामाजिक, सहकार, कृषी अशा सर्व विभागांसाठी स्वतंत्र प्रमुख नेमण्यात आले आहेत. विविध समाजघटकांपर्यंत पोहोचण्यासाठी ही संचालन समिती महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास भाजपने व्यक्त केला आहे.

**मधुमेह तपासणी**

सार्वजनिक आरोग्य विभागाने 1 जानेवारी ते 30 ऑक्टोबर 2025 या कालावधीत 1 कोटी 50 लाखांहून अधिक नागरिकांची मधुमेह तपासणी केली असून 28.55 लाख रुग्णांवर उपचार सुरू आहेत. राज्यातील सर्व शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये मधुमेहाची मोफत तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध आहे. आज जागतिक मधुमेह दिनानिमित्त राज्यभर जनजागृती उपक्रम राबवले जात असून यंदाचे घोषवाक्य "आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मधुमेह" असं आहे. मधुमेह नियंत्रणासाठी आहाराची अत्यंत महत्वाची भूमिका असते, असं मत VMV कॉलेज नागपूरच्या गृहअर्थशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख, आहारतज्ज्ञ डॉ सीमा पांडे यांनी आकाशवाणीशी बोलताना मांडलं -

दरम्यान, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात आज मधुमेह दिनानिमित्त विभागीय रेल्वे रुग्णालय आणि विविध आरोग्य केंद्रांमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी मधुमेह प्रतिबंध, लवकर निदान आणि जीवनशैली सुधारण्यावर मार्गदर्शन करण्यात आलं.

**हिवाळी अधिवेशन**

हिवाळी अधिवेशनासाठी विधिमंडळ सचिवालयाचे कामकाज येत्या 28 नोव्हेंबर पासून नागपूर इथं सुरू होत आहे. त्यादृष्टीने निवास आणि कार्यालयीन व्यवस्थेसंदर्भातील सर्व कामं तातडीने पूर्ण होईल यादृष्टीने नियोजन करावं , अशा सूचना महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव डॉ. विलास आठवले यांनी आज दिल्यात. नागपूरच्या विधानभवनात अधिवेशनासंदर्भातील व्यवस्थेचा आढावा डॉ. विलास आठवले यांनी घेतला त्यावेळी ते बोलत होते. अधिवेशन काळात विधानभवन परिसरात तसंच आमदार निवास आणि रविभवन

इथं सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, तसेच वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था सुलभ होईल यासाठी पोलीस विभागातर्फे उपाययोजना करण्यात याव्यात, संपूर्ण परिसरात स्वच्छता, अग्निशमन व्यवस्था तसेच अखंडित वीजपुरवठा राहील यासाठी महानगरपालिका व इतर विभागाने समन्वयाने काम करावे, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. विधिमंडळ अधिवेशनाचे दैनंदिन कामकाज सुरळीत व्हावे यासाठी सर्व विभागांचे सहकार्य मिळत असून सर्वांच्या सहकार्यामुळे नागपूर अधिवेशन यशस्वी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टी

नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुका जवळ येत असल्याने राजकीय हालचालींना वेग आला असून राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टीची कोअर कमिटी बैठक आमदार रवी राणा यांच्या उपस्थितीत पार पडली. बैठकीत भाजपसोबत युतीबाबत चर्चा झाली असून कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे युतीचा प्रस्ताव देण्यात आल्याचं सांगण्यात आलं आहे. युती न झाल्यास पक्ष मैत्रीपूर्ण भूमिकेतून सर्व जागांवर स्वतंत्रपणे निवडणूक लढवेल, असा ठराव सर्वानुमते पारित झाला असून अंतिम निर्णय आमदार रवी राणा घेणार असल्याचं प्रवक्ता नाना आमले यांनी स्पष्ट केलं.

## जनजातीय गौरव महोत्सव

क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या दिडशेव्या जयंतीनिमित्त नागपूर इथं उद्यापासून १७ नोव्हेंबर पर्यंत भव्य जनजातीय गौरव महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या राज्यपातळीवरच्या महोत्सवाचं उद्घाटन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते होणार आहे. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके यांनी नागपूर इथं ही माहिती दिली. याचबरोबर राज्यातल्या सुमारे चार हजार ९७५ आदिवासी गावांमध्ये शासनाच्या सर्व विभागामार्फत समग्र विकासासाठी एक व्यापक मोहीम राबवली जात असल्याचंही त्यांनी सांगितलं.

## नागपूर पुस्तक महोत्सव

'नागपूर पुस्तक महोत्सवा'मुळे शहर विचारांचे केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे यांनी व्यक्त केला. रेशीमबाग मैदानातील महोत्सवाच्या स्थळाचं भूमिपूजन आज झालं त्यावेळी ते बोलत होते. भारत सरकारचे शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र शासन, नॅशनल बुक ट्रस्ट आणि झिरो माईल युथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव २२ ते ३० नोव्हेंबरदरम्यान होणार आहे. देशभरातील ३२५ प्रकाशक, १५ लाख पुस्तकं आणि विविध साहित्यिक कार्यक्रम ही या महोत्सवाची वैशिष्ट्ये असतील.

## कसोटी क्रिकेट

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान दोन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना कोलकाता इथं आज सुरु झाला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेणार्या दक्षिण आफ्रिकेची सुरुवात निराशाजनक झाली. १५९ धावांत दक्षिण आफ्रिकेचे सर्व गडी बाद झाले. जसप्रीत बुमराह ने २७ धावांच्या बदल्यात ५ बळी घेतले. आजचा खेळ संपला तेव्हा भारताच्या १ गडी बाद ३७ धावा झाल्या होत्या.

## हवामान

विदर्भात सलग तिसऱ्या दिवशी गोंदिया मध्ये सर्वात कमी १० पूर्णांक ५ इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. याखेरीज यवतमाळ इथं ११ पूर्णांक ६ तर नागपुरात १२ अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील तापमान १२° ते १३ अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी काही दिवसात तापमानात किंचित घट संभवते असा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.